शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सन २०२०-२१ घोषित करणेबाबत...
श्री.महेश ठाकरे

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२३/प्र.क्र.६५/क्रीयुसे-२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: २६ ऑगस्ट २०२३.

वाचा:-

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र: शिछपु-२०२०/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२, दिनांक १४.१२.२०२२
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र: शिछपु-२०२०/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२, दिनांक ३१.०१.२०२३
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र: शिछपु-२०२०/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२, दिनांक ०२.०३.२०२३
४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र: शिछपु-२०२०/प्र.क्र.६५/क्रीयुसे-२, दिनांक १४.०७.२०२३

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्यातील नामवंत सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक/ जिजामाता क्रीडा पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) व साहसी क्रीडा पुरस्कार या पुरस्कारासाठी दि.१४/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारीत नियमावली विहीत करण्यात आलेली आहे. त्याआधारे सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षांच्या पुरस्कार्थींची निवड करण्यासाठी दिनांक ३१/०१/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर पुरस्कार निवड समितीच्या शिफारशी विचारात घेऊन सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षाचे पुरस्कार संदर्भाधिन शासन निर्णय दि.१४/०७/२०२३ अन्वये घोषित करण्यात आले आहेत. श्री.महेश ठाकरे यांनी सन २०२०-२१ या वर्षात आट्यापाट्या या क्रीडा प्रकारात शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) करीता अर्ज केलेला होता. श्री.महेश ठाकरे यांचे नावाचा समावेश पुरस्कार यादीमध्ये करण्यात आलेला नाही.

सन २०२०-२१ या वर्षासाठी आट्यापाट्या खेळासाठी श्री.विशाल फिरके यांना घोषित केलेल्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) पुरस्कारावर श्री.महेश ठाकरे यांनी विहित कालावधीमध्ये हरकत नोंदवलेली आहे. तसेच शासन निर्णय दि.१४.१२.२०२२ अन्वये निश्चित केलेल्या निकषानुसार सदर पुरस्कारांकरीता श्री.ठाकरे यांना मिळणारे गुणांकन श्री.फिरके

यांचेपेक्षा जास्त असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. त्यानुषंगाने सन २०२०-२१ या वर्षांसाठी आट्यापाट्या या खेळासाठी घोषित करण्यात आलेल्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) करीता श्री.ठाकरे यांच्या नावाचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय:-**

सन २०२०-२१ या वर्षांकरीता घोषित करण्यात आलेल्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) परिशिष्ट-क मध्ये आट्यापाट्या या खेळासाठी श्री.विशाल फिरके यांचेसह श्री.महेश ठाकरे यांनाही सदर पुरस्काराने सन्मानित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांनी श्री.फिरके यांचेसह श्री.ठाकरे यांना सदर पुरस्काराने सन्मानित करणेची आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(ज्ञानेश्वर आव्हाड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२) मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) पुरस्कार सन्मानार्थी श्री.महेश ठाकरे व श्री.विशाल फिरके
८) निवड नस्ती (क्रीयुसे-२)